**प्रेसनोट दिनांक २४/७/२०१९**
**हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर**
**सात वर्षाचे मुलास सुखरूपपणे वडीलांचे ताब्यात दिले.**

दिनांक २४/७/२०१९ रोजी १३.०० वाजता शाम व्यंकट घाडगे पोलीस मित्र संघ अध्यक्ष,हडपसर पुणे यांना मुलगा नामे अक्षय बाळु चव्हाण वय ७ रा.जेजुरी ता पुरंदर जि पुणे हा काळेपडळ हडपसर पुणे या ठिकाणी रडत असले अवस्थेत मिळाला तो घाबरलेला होता त्यास त्याची आपुलकीने विचारपुस केली व त्यास लागलीच हडपसर पोलीस स्टेशन या ठिकाणी आणले व मपोउनि निकम यांचे ताब्यात दिले त्याचेकडे मपोउनि निकम यांनी चौकशी करुन तो जेजुरी येथुन गाडीवर बसुन आल्या बाबत सांगितले त्याचे वडीलांचे पत्त्याची विचारपुस करता बाळु पांडुरंग चव्हाण जेजुरी असे असल्याचे सांगितले लागलीच मपोउनि निकम यांनी जेजुरी पोलीस स्टेशन या ठिकाणी तातडीने संपर्क साधुन जेजुरी पोलीसांना माहीती दिली जेजुरी पोलीसांनी त्याचे वडीलांचा पत्ता शोधुन वडीलांना हडपसर पोलीस स्टेशन या ठिकाणी पाठवले सदर वरील मुलगा हा त्याचे वडील बाळु पांडुरंग चव्हाण रा जेजुरी ता पुरंदर जि पुणे यांचे ताब्यात दिला आपला मुलगा पाहुन त्यांना आनंद झाला त्यांनी पोलीस मित्र शाम व्यंकट घाडगे तसेच मपोउनि निकम यांचे आभार मानले.

(रघुनाथ जाधव)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
हडपसर पोलीस स्टेशन
पुणे शहर

प्रेसनोट दिनांक २४/७/२०१९

दिनांक २४/७/२०१९ रोजी रात्रौ २०.०० वाजता एक मुलगी वय ५ ही पालखी ठिकाणी हरवली होती ती सुमित दत्तात्रय डोंगरे वय १७ रा जय तुळजा भवानी वसाहत गाडीतळ हडपसर पुणे ९०९७९७८०५५ यास मिळुन आली तीला तिचे संपुर्ण नाव सांगता येत नव्हते तीस पोलीस स्टेशन या ठिकाणी आणुन जमा केले तीचा तीची आई सुधा तुळशीदास मार्कड रा.वेताळबाबा वसाहत स नं ५ गाडीतळ हडपसर पुणे मो नं ९१७५३९४७६९ हया शोध घेत होत्या त्यांनी तेथील वारकरी यांनी मुलीस हडपसर पोलीस स्टेशन या ठिकाणी नेले असल्या बाबत सांगितले तिची आई पोलीस स्टेशन या ठिकाणी आली मुलगी हीस पाहुन आईला आनंद झाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांनी मुलगी प्रांजल हीस तीची आई सुधा हीचे ताब्यात दिले व सुमित दत्तात्रय डोंगरे याने मुलीस पोलीस स्टेशन येथे आणले या बददल त्याचे कौतुक केले .

(रघुनाथ जाधव)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
हडपसर पोलीस स्टेशन
पुणे शहर